D:\APA 2024\Letter 2024.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा :

१) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.अेजीयू-११०९/सीआर-२५२/६-ए दिनांक १८.३.२०१०
२) कृषि व पदुम विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.अेजीयू-११०९/सीआर-२५२/६-ए दिनांक २०.९.२०१०
३) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्र.६५९१/२०१४ मधील अंतिम निकाल दि.११.६.२०१४
४) विद्यापीठ आदेश अेपीअे-५४१ दिनांक २९.२.२०१६
५) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-१५१७/प्र.क्र.४९७/६-ए दिनांक २४.८.२०१८
६) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्र.१३८५८/२०१८मधील अंतिम निकाल दि.१८.१०.२०२३

**सहयोगी प्राध्यापक पदावर तात्पुरती पदोन्नती दिलेल्या कालावधीत अतिप्रदान झालेले वेतनाची रक्कम वसुल करणे बाबत.**

विद्यापीठ परिपत्रक
क्रमांक.२०२४/प्र.क्र.११९४/अतिप्रदान/आस्था-१/5657
दिनांक : १६ डिसेंबर २०२४

सहयोगी प्राध्यापक पदाच्या पात्रतेसंदर्भात विद्यापीठ परिनियमात सुधारणा न झाल्यामुळे सन २०१०-२०१४ या कालावधीत विद्यापीठातील सहायक प्राध्यापकांना सहयोगी प्राध्यापक या पदावर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. सदर तात्पुरत्या पदोन्नती कालावधीत संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रकातील तरतूदीनूसार वेतन अदा करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.५ वरील शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रक रद्द करण्यात येऊन अतिप्रदान झालेले वेतन वसूल करण्याबाबत आदेशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने सर्व आहरण व सवितरण अधिका-यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या व सन १८.३.२०१० ते १५.३.२०१४ या कालावधीत सहयोगी प्राध्यापक या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या सहयोगी प्राध्यापकांची संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रकानूसार वेतननिश्चीती करून वेतन अदा करण्यात आले असल्यास त्यांची सुधारीत वेतननिश्चीती संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयानूसार करण्यात यावी. सदर सुधारीत वेतननिश्चीतीच्या अनुषंगाने अतिप्रदान झाल्याचे निर्दशनास आल्यास अतिप्रदान रक्कमेची वसूली एकरकमी / दरमहा मासिक वेतनातून करण्यात यावी

तसेच सन २०१० मध्ये सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सहयोगी प्राध्यापक या पदावर कार्यरत / सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांची वेतननिश्चिती ही संदर्भ क्र.२ वरील शासन शुध्दीपत्रकानूसार झालेली असल्यास ती रद्द करून संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयानूसार करण्यात यावी. सदर सुधारीत वेतननिश्चीतीच्या अनुषंगाने अतिप्रदान झाल्याचे निर्दशनास आल्यास अतिप्रदान रक्कमेची वसूली एकरकमी / दरमहा मासिक वेतनातून करण्यात यावी. अतिप्रदान वसुली रक्कमेबाबत कोणतीही हयगय होणार नाही याची संबंधित कार्यालय प्रमुख व आहरण व सवितरण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सबब सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिनस्त असलेल्या अतिप्रदान वसुल पात्र अधिका-यांची वसूल करावयाची रक्कम कोणत्या पध्दतीने वसूल करत आहात याबाबतचे विवरणपत्र या कार्यालयास दिनांक ३१.१२.२०२४ पर्यत सादर करावे.

मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

( संतोष वेणीकर )
कुलसचिव